आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार, दिनांक ०३ ऑक्टोबर २०२३

ठळक बातम्या

1. दिवाळीनिमित्त शिधापत्रिकाधारकांना शंभर रुपयात आनंदाचा शिधा मिळणार; मैदा आणि पोह्याचा देखील समावेश करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय.

2. नागपूरला पाच अतिरिक्त कौटुंबिक न्यायालयं स्थापन करणार: ४५ पदांनाही राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी.

3. राज्यातील 2 हजार 359 ग्रामपंचायतींसाठी 5 नोव्हेंबरला मतदान: 3 हजार 80 रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी देखील मतदान.

4. नांदेड इथल्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात मागील ४८ तासात ३१ जणांचा मृत्यू, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी रुग्णालयाला भेट देऊन घटनेच्या सखोल चौकशीचे दिले आदेश.

********

मंत्रिमंडळ बैठक निर्णय

दिवाळीनिमित्त शिधापत्रिकाधारकांना शंभर रुपयात आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या शिध्यात आता मैदा आणि पोह्याचा देखील समावेश करण्यात आला आहे. पूर्वी आनंदाचा शिधा या संचात रवा, चणा डाळ, साखर आणि खाद्यतेल असे ४ जिन्नस होते. मात्र आता यामध्ये दोन जिन्नसांची भर पडली आहे. राज्यातील अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजी नगर आणि अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकरी अशा १ कोटी ६६ लाख ७१ हजार ४८० शिधापत्रिकाधारकांना हा आनंदाचा शिधा मिळेल. कृषी पंप वीज जोडण्या वेगाने पूर्ण करण्यासाठी उच्च दाब वितरण प्रणाली योजनेला ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णयही आज झाला. विदर्भ, मराठवाड्यातील प्रलंबित कृषी पंप वीज जोडणी यातून पूर्ण करण्यात येईल. याशिवाय अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेस मान्यता देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. दरवर्षी २७ विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळेल.

अतिरिक्त कौटुंबिक न्यायालय

नागपूरला ५ अतिरिक्त कौटुंबिक न्यायालये स्थापन करून ४५ पदांना मंजुरी देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. नागपूर येथे ४ कौटुंबिक न्यायालये असून वाढत्या कौटुंबिक विवादांच्या प्रकरणांमुळे ५ अतिरिक्त कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या नागापूरच्या कौटुंबिक न्यायालयांमध्ये ८ हजार ४१८ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहेत. या न्यायालयांच्या उभारणीपोटी ५ कोटी ६० लाख ५४ हजार रुपयांच्या खर्चास देखील बैठकीत मान्यता देण्यात आली.

प्रकाशन

डॉ.आंबेडकर लेखन आणि भाषणे - खंड २३ (इंग्रजी), जनता ३-३, जनता खास अंक १९३३ आणि इंग्रजी खंड २ चा मराठी अनुवाद (भाग १ आणि २) या नवीन ग्रंथांचं आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. मंत्रिमंडळ बैठकीनंतर झालेल्या या प्रकाशन प्रसंगी उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीच्या वतीने आतापर्यंत डॉ. आंबेडकर लेखन आणि भाषणाचे २२ खंड प्रकाशित झाले असून २३ वा खंड हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'एम. एससी.' च्या पदवीकरिता सादर करण्यात आलेल्या 'Provincial Decentralization of Imperial Finance in British India' या शोधप्रबंधाविषयी आहे. हा शोध प्रबंध 'लंडन स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स' ला १९२१ मध्ये सादर करण्यात आला होता. हा शोध प्रबंध तब्बल १०० वर्षानंतर प्रकाशन समितीला नोव्हेंबर २०२१ मध्ये लंडनच्या सिनेट ग्रंथालयाकडून प्राप्त झाला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा

उत्तर अमेरिकेत मेरीलँड इथं येत्या १४ ऑक्टोबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्वात उंच पुतळ्याचं अनावरण होणार आहे. स्टॅच्यू ऑफ इक्वॅलिटी नावाचा हा 19 फूट उंचीचा पुतळा ख्यातनाम शिल्पकार राम सुतार यांनी तयार केला आहे. गुजरातमध्ये अहमदाबाद इथला सरदार पटेल यांचा पुतळाही त्यांनीच साकारला आहे. अमेरिकेत मेरीलँडमध्ये अकोकीक शहरात 13 एकर जागेवर भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यात आला आहे.

पोटनिवडणुक

राज्यभरातील सुमारे 2 हजार 359 ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आणि 2हजार 950 सदस्यपदाच्या; तर 130 सरपंचांच्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी येत्या 5 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू.पी.एस.मदान यांनी केली. संबंधित ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे. नामनिर्देशनपत्रे 16 ते 20 ऑक्टोबर या कालावधीत दाखल करता येतील. 5 नोव्हेंबर रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान होईल. मतमोजणी 6 नोव्हेंबर रोजी होईल.

सोयाबीन पंचनामा

राज्यातील नऊ जिल्ह्यांमध्ये सोयाबीनच्या पिकावर पिवळा मोझेक हा विषाणूजन्य रोग आणि खोडकूज, मूळकूज या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला असून कृषी विभाग आणि मदत आणि पुनर्वसन विभागांनी संयुक्तपणे तातडीने सोयाबीन पिकांचे पंचनामे सुरू करावेत, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीत दिले. पावसाचा मोठा खंड आणि सप्टेंबरमध्ये झालेला पाऊस, तापमानात बदल तसेच इतर काही कारणांमुळे सोयाबीनवर या रोगाचा प्रादुर्भाव झाला

आहे. विशेषत: चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, यवतमाळ, सोलापूर, लातूर, वाशिम, नांदेड या जिल्ह्यांत हा प्रादुर्भाव दिसत असल्याने सोयाबीनचे पीक पिवळे पडत चालले आहे.

नांदेड रुग्णालय

नांदेड इथल्या डॉ शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात झालेल्या रुग्णांच्या मृत्यूचा आकडा आता ३१ वर पोचला आहे. जिल्हा रुग्णालय प्रशासनाने म्हटलं आहे की, रुग्णालयातले अत्यवस्थ रुग्ण तज्ज्ञांच्या देखरेखीखाली असून त्यांना सर्व वैद्यकीय सेवा पुरवण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासन करत आहे. जिल्हा आणि राज्याच्या इतर भागातून आलेल्या अत्यवस्थ रुग्णांची संख्या एकदम वाढल्यानं हे मृत्यू झाल्याचं डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, विष्णुपुरीच्या वैद्यकीय अधीक्षकांनी सांगितलं. या पार्श्वभूमीवर आज वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी रुग्णालयाला भेट देऊन पाहणी केली. रुग्णालयातील पायाभूत सुविधा वाढविणे आणि अन्य सोयी - सुविधा याकडे लक्ष दिल्याबद्दल त्यांनी माहिती दिली.

*आता आम्ही सगळया लोकप्रतिनिधींशी चर्चा केली, आम्ही डीन आणि डॉक्टरांशी चर्चा केली. वास्तविक हि दुर्दैवी घटना आहे असं घडायला नको होत. परंतु त्याची अनेक जरी कारण असली तरी आता जे आपल्याकडे जे पेशंट आहे यापुढे कोणी दगावणार नाही याची काळजी आपण घेतली पाहिजे, परिस्थिती सामान्य केली पाहिजे आणि यासाठी आवश्यक ते सर्व मनुष्यबळ, डॉक्टर्स खाजगी असतील किंवा आमच्या वैद्यकीय महाविद्याचे डॉक्टर्स पाठवू आपण एक-एक पेशंटची आपण काळजी घेऊ, आज हे जे मृत्यू झालेले आहेत त्यांची प्रत्येक मृत्यू झालेल्यांची चौकशी करू सखोल. खरोखरच याच्यामध्ये कोणाचा हलगर्जीपणा होता का, औषधाचा पुरवठा नव्हता का, याला कारण काय, याची सखोल चौकशी करू.*

ही घटना दुर्देवी असल्याचं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी म्हटलं आहे, तर ही घटना शासकीय आरोग्य व्यवस्थेला काळिमा फासणारी आहे, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटलं आहे. नांदेड आणि संभाजी नगर रुग्णालयातील मृत्यू ही सरकारी हत्या असून कलम ३०२ अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

घाटी रुग्णालय

छत्रपती संभाजीनगर शहरातल्या घाटी रुग्णालयामध्ये कालपासून २४ तासांत दोन नवजात बालकांसह १० जणांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

आशियाई क्रीडा

हँगझोऊ इथल्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या दहाव्या दिवशी भारतानं आणखी एक कांस्य पदक जिंकून आपली विजयी घोडदौड कायम ठेवली. भारतानं आतापर्यंत 13 सुवर्ण, 24 रौप्य आणि 24 कांस्य अशा एकूण ६१ पदकांची कमाई केली असून, सध्या पदक तालिकेत भारत चौथ्या स्थानावर आहे. आशियाई स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी केलेल्या दिमाखदार कामगिरीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे.

'दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी'

विविध प्रवर्गातील दिव्यांग बांधवांच्या अडचणी सोडविण्यासाठी 'दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी' अभियानाचा अकोला जिल्हास्तरीय कार्यक्रम पोलीस लॉन येथे आयोजित करण्यात आला. दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष बच्चू कडू, जि. प. अध्यक्ष संगीता अढाऊ यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. हे अभियान राज्यभर राबविण्यात येत असून, शासनाच्या सर्व विभागांचे अधिकारी, सर्व शासकीय यंत्रणा एकाच ठिकाणी उपस्थित राहून दिव्यांगांच्या तक्रारी जाणून घेऊन त्याच ठिकाणी त्यांचा निपटारा करण्यात येणार आहे. अधिकाधिक दिव्यांग बांधवांनी यावेळी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी केले आहे.

नवेगाव-नागझिरा

नवेगाव - नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या वार्षिक वेळापत्रकानुसार ३० जून रोजी जंगल सफारी बंद करण्यात आली. १ ऑक्टोबरपासून तीन महिन्यांनी पर्यटकांसाठी ही जंगल सफारी सुरू झाली आहे. मात्र, व्याघ्र प्रकल्पांतर्गत असलेले कोका अभयारण्य सततच्या पावसामुळे पर्यटकांसाठी खुलं होऊ शकले नाही. ते उघडण्यासाठी आणखी काही दिवस लागतील.

हवामान

पूर्व विदर्भात नागपूरसह भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये आज वादळ आणि हलक्या पावसाचा येलो अलर्ट जरी करण्यात आला आहे. पश्चिम विदर्भात हवामान सामान्य राहील. उर्वरित आठवड्यात पावसाचा अंदाज नसल्याचं हवामान विभागाने स्पष्ट केलं आहे.

सुधीर मुनगंटीवार

महात्मा गांधींनी दिलेला अहिंसेचा मंत्र जगाने आज स्वीकारला आहे, असे उदगार संस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी काल लंडन येथे काढले. गांधी जयंतीनिमित्त लंडन इथल्या अव्हॉस्टिक चौकातील महात्मा गांधी यांच्या पुतळयास अभिवादन केल्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

******